जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.०२०-२६१२३३७१ E-Mail- homebranchpune@gmail.com

क्र.जि.आ.व्य/कावि/७८८/२०२०.
पुणे, दिनांक :-२४/०३/२०२०

वाचले :-

१) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७
२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५
३) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील क्रमांक कोरोना/२०२०/प्रक्रं.५८/आरोग्य -५ दि.१३.०३.२०२०, दि.१४.०३.२०२० तसेच दि.१५.०३.२०२० रोजीची अधिसुचना
४) इकडील जा.क्रं.नैआ/करोना विषाणु/१५४/२०२० दि.२२.०३.२०२० रोजीचा आदेश
५) फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४(१)(३) आदेश क्रं.नैआ/कोरोना विषाणु/१५१/२०२० दि.२२.०३.२०२०
६) इकडील जा.क्रं.जि.आ.व्य/करोना विषाणु/१५६/२०२० दि.२२.०३.२०२० रोजीचा आदेश
७) महाराष्ट्र शासन यांचेकडील नं.DMU/२०२०/CR.९२/DISM-१ दि.२३.०३.२०२०

**विषय :-महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ४३(१) अन्वये सर्व धार्मिक प्रार्थनास्थळ बंद ठेवणेबाबतचा आदेश.**

**आदेश**

(१) ज्याअर्थी कोरोना विषाणुचा संसर्ग व प्रसार भारतात, महाराष्ट्रात , पुणे ग्रामीण भागात गतीने पसरत आहे असे दिसुन येत आहे. या पार्श्वभुमीवर या कार्यालयाकडील आदेश क्रं.जिआ.व्य/कोरोना विषाणु/१५६/२०२० दि.२२.०३.२०२० अन्वये पुणे ग्रामीण कार्यक्षेत्रात फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४(१)(३) प्रमाणे जमावबंदी आदेश अंमलात आहे.

(२) त्याशिवाय राज्य सरकार यांच्या मंत्रालयाने महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रं.DMU/२०२०/CR.९२/DISM-१ दि.२३.०३.२०२० आपत्ती व पुनवर्सन व्यवस्थापन विभाग, मंत्रालय, मुंबई मधील मुददा क्रं.११ अन्वये जाहिर केलेप्रमाणे कोरोनाग्रस्त रुग्णांचे संपर्कात लोकांनी येवु नये, तसेच सर्व धार्मियांच्या प्रार्थनास्थळी जनसुमदाय जमण्याचा संभव लक्षात घेवुन त्याठिकाणी कोरोना विषाणु साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव होण्याचा संभव आहे. तेव्हा त्यासाठीचा प्रादुर्भाव किंवा फैलाव होवु नये म्हणुन त्यासाठी आवश्यक वाटतील असे आदेश तात्काळ करणे आवश्यक आहे. यासाठीच्या उपाययोजनेकरिता महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ४३(१) अन्वये नमुद केलेल्या तरतुदींच्या अनुषंगाने सर्व धर्मियांच्या जनतेस त्यांच्या कोणत्याही ठिकाणच्या प्रार्थनास्थळांवर समुदायाने न जमण्याच्या उद्देशाने मनाई आदेश काढणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झालेली आहे.

(३) त्याअर्थी मी. नवल किशोर राम, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी पुणे म्हणुन पुणे ग्रामीण कार्यक्षेत्रात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ४३(१) अन्वये कोणत्याही धर्माच्या व्यक्तीला पुणे ग्रामीण कार्यक्षेत्रातील कोणत्याही प्रार्थनास्थळावर समुदायाने न जमण्यासाठी सर्व धर्माची प्रार्थनास्थळे नागरिक, भाविक, शिष्य, समर्थक, या सर्वांसाठी दि.२३.०३.२०२० चे २१.०० ते दि.३१.०३.२०२० चे २४.०० वा चे दरम्यान बंद राहतील असे आदेश देत आहे.

(४) मात्र सदर प्रार्थनास्थळातील दैनंदिन तसेच पारंपारिक पुजाविधी करण्यासाठी संबधित प्रार्थनास्थळाच्या व्यवस्थापनाने निर्देशित केलेले पुजारी/ धर्मगुरु यांना परवानगी राहील. त्यांची नावे स्थानिक पोलीस स्टेशनला कळविण्यात यावी.

(५) सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे शिक्षेस पात्र राहिल सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्कयानिशी आज दि.२३.०३.२०२० रोजी दिलेला आहे.

(नवल किशोर राम)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

जिल्हादंडाधिकारी पुणे

प्रत :- (१) मा.मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य
(२) मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे
(३) पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
(४) सहा. धर्मादाय आयुक्त पुणे व वक्फ बोर्ड पुणे

Scanned by CamScanner